राज्य योजना सन २०१९-२०२०
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या योजनेतर्गत निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः- डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र.१५७ /फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २८ मे, २०१९

वाचा :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०३/१९-२०/२०९, दिनांक :- २१.०५.२०१९.

प्रस्तावना :-

सन २०१९-२०२० मध्ये राज्यस्तरीय योजनेतंर्गत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ५०००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भिय वित्त विभागाच्या परिपत्रकात **"सन २०१९-२०२० या वर्षाकरीता प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूच या अर्थसंकल्पीय प्रकाशनातील "स्तंभ क्रमांक ५ व ६" यामध्ये विभागांना दर्शविलेल्या रकमांचे अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) वाटप करण्यात येत असून सदर तरतूदींची एप्रिल ते जुलै, २०१९ पर्यतची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागाकडून नोंदविण्यात आल्यांनतर विभागास आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा निधी (लेखानुदान) वितरीत केला जाईल. त्याचे तात्काळ वाटप करावे."** असे नमूद करण्यात आले आहे.

३. संदर्भ क्रमांक १ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रामाणे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना (२४०६-८७११) या लेखाशिर्षाअंतर्गत अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वर रु. १६६६.६० लक्ष निधी माहे एप्रिल ते जुलै, २०१९ पर्यत वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सन २०१९-२०२० करीता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना (२४०६-८७११) या योजनेतर्गत रु. ७९६.१२ लक्षचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेला प्रस्ताव व डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना (२४०६-८७११) या योजने अंतर्गत

उपलब्ध निधीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार **रुपये ७९६.१२ लक्ष** निधी वितरीत करण्यात येत आहे.

I. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०१९-२० मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२, पर्यावरणीय वनिकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवांचे संरक्षण, (००) (१८) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

II. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

III. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

IV. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

V. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

VI. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२ ,दिनांक - १७.०४.२०१५ व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक - :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे .

VII. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक -०५.१५/ प्र क्र १५५/फ-१, दिनांक ४/०८/२०१५ व दिनांक १७.०७.२०१७, शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१७/प्र.क्र.९७/फ-१ दिनांक २१.०३.२०१८ आणि शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०४१७/प्र.क्र.१२७/फ-१ दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ च्या अटींचे पालन होत असल्याची खात्री करुनच प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निधी वितरीत करावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१४२७०४८११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL DESHBHRATAR

Digitally signed by SWAPNIL DESHBHRATAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c79 28e692d77c386, postalCode=400037, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=ce420aedd83773a67f861ab4c751835b3c5119f8fc41f2f 3aa39bd7749dc02e0, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL DESHBHRATAR
Date: 2019.05.28 14:30:27 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली.
६. वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
७. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
८. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
९. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १५७ /फ-१, दिनांक :-२८.०५.२०१९ सोबतचे सहपत्र.

अ.क्र.	तपशिल	रक्कम (लक्ष)
१	वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.	१००.००
२	वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.	५६५.११
३	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली.	१३१.०१
	एकूण	**७९६.१२**